Cosmos Multidisciplinary Research E-Journal  Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal  Impact Factor 4.94  ISSN No. 2456-1665

# स्वामी विवेकानंदाचे वेदान्त तत्वज्ञान

**डॉ.बाबासाहेब पाबळे**
राज्यशास्त्र विभागप्रमुख,
कला,वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, अंकुशनगर

प्रस्तावना :—

जगाच्या पाठीवर भारत ही एकमात्र भूमी आहे की, जेथे कधीही धार्मिक छळवाद झाला नाही. कोणालाही आपल्या धार्मिक श्रद्धेपासुन वंचित केले नाही. येथे आस्तिक, नास्तिक, एकेश्वरवादी,द्वैतवादी, अद्वैतवादी यांना कोणतीही अवहेलना सहन करावी न लागता गुण्यागोविंदाने नांदत आहेत. ज्या धर्माने जगाला केवळ सहिष्णूताच नव्हे, तर वैश्विक मान्यता शिकविली आहे. अशा ह्या हिंदू धर्माचा मी अनुयायी आहे याचा मला सार्थ अभिमान आहे असे स्वामी विवेकानंद म्हणतात.

''स्वामी विवेकानंदामुळे आपणास वेदान्ताचा खरा अर्थ कळाला आहे. वेदान्त हाच विवेकानंदाचा श्वास होता. निसर्गात दिसणाऱ्या साऱ्या चराचर सृष्टीत एकच एक ईश्वरी तत्व भरुन राहिलेले आहे. हे जाणून माणसाने निसर्गाविषयी आदरभाव बाळगावा. नैसर्गिक साधनसंपतीचा काटकसरीने वापर करावा व नैसर्गिक समतोल कायम ठेवावा. ह्या विषयी जागरुक असावे. आधुनिक विज्ञानासही ह्या गोष्टी सत्य वाटतात. एकमेव तत्वास सत्यास अनेक लोक परत्मा ब्रम्ह अशा विविध नावाने संबोधतात. हे श्रीरामकृष्णांच्या जीवनाचे सारभूत तत्वे होते. स्वामी विवेकानंदानी सर्व संदेश सर्वधर्म परिषदेपुढे, मांडून संपूर्ण पाश्चात्य जगात भारताचे गुणगौरव केले. स्वामी विवेकानंद म्हणतात, प्रत्येक माणसात ईश्वरतत्वे असतात. स्वामीजींनी कर्म, ज्ञान व भक्ती या शब्दात वेदान्त तत्वज्ञान मांडले आहे. सामान्य माणसासाठी भक्ती हाच धर्म, धर्मतत्पर माणसासाठी ज्ञानमार्ग हाच खरा धर्म होय असे विचार स्वामी विवेकानंदाने आपल्या 'वेदान्त तत्वज्ञानाच्या अभ्यासातून मांडले आहे. अरविंद घोष यांच्यामते, ' प्राचीन भारतीय परंपरांचे संरक्षन करण्यासाठी हिंदू धर्माची पुनर्निमीती विवेकानंदाना करावयाची होती. दयानंदापेक्षा विवेकानंदानी आपले कार्य अधिक प्रभावीपणे केले.' रविंद्रनाथ टागोर यांच्या मते, ' भारताला समजावून घ्यावयाचे असेल तर विवेकानंदाना समजावून घ्यावे लागेल, त्यांचे विचार आत्मसात करावे लागतील. प्रत्येक प्राणीमात्रात ब्रम्ह असल्याचा त्यांचा संदेश अलौकिक आहे.'

संशोधनाचा उद्देश :

प्रस्तुत संशोधनामध्ये स्वामी विवेकानंदांनी वेदान्त तत्वज्ञान स्पष्ट करत असताना मानवी जीवनामध्ये वेदान्तातील कर्म ,ज्ञान व भक्ती या मानवी जीवनाशी ज्ञानमार्ग आत्मसात करण्यासाठीच्या विचारांचा अभ्यास करणे हा प्रस्तूत संशोधनाचा मुख्य उद्देश आहे.

संशोधन पद्धती :

प्रस्तूत संशोधनात्मक विषयाचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम या साधनांचा वापर करुन प्राप्तं माहितीच्या आधारे संदर्भ ग्रंथ, माहिती व इतर साहित्याच्या माध्यमातून संशोधनात्मक विषयाची मांडणी केली आहे.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

स्वामी विवेकानंदाचे वेदान्त तत्वज्ञानः

हिंदूधर्माच्या तत्वज्ञानाचे सार वेदान्त :

विवेकानंद म्हणतात की प्रत्येक जीव अव्यक्त ब्रम्ह आहे.'। हिंदू धार्मिक मतांच्या पहिल्या वर्गाची म्हणजे द्वेतवादाची सुरुवात ईश्वराच्या संकल्पनेपासुन होते. आमच्यासमोर विश्व आहे आणि हे विश्व कोण्या विशेष पुरुषाद्वारे निर्मीत केलेले आहे. या ब्रम्हांडात जे काही आहे ती सर्व ईश्वराचीच रचना आहे. आत्म्याची कल्पना येते की आपले शरीर आहे आणि या शरीराच्या आत असे काही आहे. जे शरीर नाही. भारतात धर्माची ही फार प्राचीन कल्पना आहे. आपली दैवसंपदा अभिव्यक्त करण्यासाठी व्यक्तीला आपले व्यक्तीमत्व विकसीत करावे लागते. म्हणजेच विविधतेतील एकात्मता अनुभवावी लागते आणि संपुर्ण मानवी जातीला एक दिव्य रुप प्राप्त करुन देण्याची शक्ती प्राप्त करुन घ्यावी लागते या संदर्भात विवेकानंद म्हणतात, धर्माचा अर्थ आहे विकास, विकास म्हणजे साक्षात्कार किंवा उच्चतम अनुभूती . केवळ मंत्र पुराणे किंवा गुडघे टेकणे नव्हे

मानवाला ईश्वरत्व प्राप्त करुन घ्यायचे आहे. प्रगतीच्या मार्गावर पुढे पुढे जावयाचे आहे.'[2] अशा रितीने धर्म ही अनुभूतीची गोष्ट आहे. केवळ कागदावर मांडलेल्या तत्वांचे भेंडोळे म्हणजे धर्म नव्हे, धर्म म्हणजे आत्मसाक्षात्कार होय.'[3]

अद्वैत वेदान्त आणि धार्मिक समन्वय हाच विवेकानंदाच्या विचारांचा पाया :—

स्वामी विवेकानंदाचे राजकीय विचार हे तात्विक आणि धार्मिक विचारावर आधारीत असल्याचे दिसते. त्यांचे राजकीय तत्वज्ञान केवळ तात्वीक नाही तर त्याचा वास्तविक जीवनाशी संबंध असल्याचे दिसते. याच मानवी जीवनावर त्याच्या विचारांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. स्वामी विवेकानंदामुळे आपणास वेदान्ताचा खरा अर्थ कळाला आहे. वेदान्त हाच त्यांच्या राजकीय विचारांचा प्रमुख पाया होता. विवेकानंदाच तत्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी त्यांच्या सर्व लिखानाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. ज्ञानयोग, पतंजली, भारत आणि पाश्चिमात्य राष्ट्रात वेदांवर दिलेली व्याख्याने यातुन त्यांचे तात्वीक विचार स्पष्ट झाले आहे.'[4] सर्व

समावेशक हिंदू धर्म :

स्वामी विवेकानंदाच्या मते हिंदू धर्म हाच सर्वश्रेष्ठ व सर्व संग्राहक आहे. कारण हिंदू धर्माचा गाभा वेदान्ताचा आहे. वेदान्तवगळता अन्य सर्व धर्म पंथच आहेत. वेदान्त गाभा असलेला हिंदू धर्म असा श्रेष्ठ आहे की, खिस्ती धर्म ही त्याची एखादी फांदी असून बौद्ध धर्म मुलगाच आहे. वेदान्तात असलेली शिकवण परिपूर्ण असल्यामुळे वेदान्ता बाहेरचा एकही विचार जगातील कोणत्याच धर्मात सांगितला गेला नाही असे विवेकानंदाचे मत आहे. मुर्तीपुजेपासुन पुराणापर्यंत, कर्मकांडापासुन सदाचारापर्यंत आणि जैनांच्या नास्तिकवादापासुन बुद्धांच्या शुन्यवादापर्यंतचे सर्व प्रवाह वेदान्तात सामावलेले आहे. वेदान्त म्हणजे सर्व धर्माच आदर्श समन्वय आहे.[5]

वेदान्त मानवी जीवनात आत्मविश्वास निर्माण करतो :

विवेकानंद म्हणतात वेदान्त प्रतेक मानवाच्या जीवनात आत्मविश्वास निर्माण करतो'.[6] जो मनुष्य ईश्वरावर विश्वास ठेवत नाही त्याला अनेक धर्मांनी नास्तिक किंवा पाखंडी म्हटले आहे. याउलठ स्वताच्या सामर्थ्यावर विश्वास नाही, जो स्वतःला दुबळा समजतो, त्यालाच वेदान्ताने नास्तिक म्हटले आहे. आपल्या आत्म्याचे सामर्थ्य न ओळखने म्हणजे नास्तिकवाद झाला. मनुष्य पापी असतो हे वेदान्ताला मान्य नाही उलट माणसाच्या चुका वेदान्त मान्य करतो आपण दुबळे आहोत, आपल्या जवळ सामर्थ्य नाही, आपण हे करु शकणार नाही या भुमीकेला वेदान्त मान्य करत नाही. मानवाला त्यांच्या दिव्यत्वाची अनुभूती वेदान्त देतो. धर्माचा प्रत्येक आदर्श जीवनात आचरण करण्यासाठी वेदान्त व्यक्तिला मार्गदर्शन करतो.'' विवेकानंद म्हणतात आदर्शाची अनुभुती

घेण्यासाठी आत्मविश्वासाची आवश्यकता असते. परंतु हा आत्मविश्वास स्वार्थी नसतो कारण वेदान्ताच्या सांगण्याप्रमाणे आत्मविश्वासात एकात्मतेची बीजे असतात. आपण सर्व एक आहोत अशी भूमिका असल्याने आपल्यावरील विश्वास हा सर्वांवरील विश्वासहोय. स्वतावरचे प्रेम म्हणजे सर्वांवरील प्रेम होय. चराचर हाच व्यक्तिच्या प्रेमाचा विषय झाला'[8]

स्वामी विवेकानंदाचा नववेदान्तवाद :–

स्वामी विवेकानंद असे मानत होते की, भारतात जेवढे वैचारिक, तात्वीक संप्रदाय येतात ते सर्व वैदीक विचाराच्या अंतर्गतयेतात. वेदाच्या बऱ्याच व्याख्या आहेत. विवेकानंदाच्या विचारानुसार त्या प्रगतशील आहेत. सुरुवातीला द्वैतवादी व्याख्या झाली, त्यानंतर अद्वैतवादी व्याख्या झाली. वेदान्त या शब्दाचा अर्थ होतो, 'वेदाचा अंत' वेद हा हिंदू धर्माचा धर्मग्रंथ आहे. पाश्चात्य देशात वेदाला केवळ कर्मकांडच मानले जाते. भारतात साधारणतः वेद या शब्दापासुन वेदान्त समजला जातो. हे लो क वेदाला श्रुती म्हणतात. याचा अर्थ असा नाही की जो ग्रंथ वेद या नावाने प्रसिद्ध आहे. त्याची रचना वैदीक कर्मकांडानंतर झाली. उपनिषेद जो यजुर्वेदाचा चाळीसावा अध्याय आहे. तो वेदाच्या प्राचीन अंशातलाच एक आहे. स्वामी विवेकानंद नववेदान्ताची व्याख्या करताना म्हणतात की, अशी ही उपनिषदे आहेत जी ब्राम्हणांचा अंश आहे. अन्य उपनिषदे ना ब्राम्हणांच्या ना वेदांच्या अंतर्गत येतात. यावरुन असे समजु नये की ते वेदांच्या इतर भागांपासुन पुर्णतः स्वातंत्र आहेत.'[9]

सारांश :–

हिंदू धर्मातील प्रबोधनाची अवस्था दयानंदाच्या काळापेक्षा स्वामी विवेकानंदाच्या काळात अधिक स्वावलंबी आणि पुर्णत्वाला पोहचली होती. पाश्चात्य ज्ञानापेक्षा हिंदू अध्यात्मवादाला अधिक परिणामकारक बनविण्याचे कार्य विवेकानंदांनी केले म्हणून, स्वामी विवोकानंदानी वेदान्त तत्वज्ञानासंबंधी मांडलेले विचार मुलगामी स्वरुपाचे आहेत. त्यांच्या काळामध्ये ब्रिटीशांचे भारतावर झालेले आक्रमण व त्यांची भौतीक प्रगती हिंदू धर्माची अगोदरच पिछेहाट झाली होती. त्यातच आडणी पुरोहितांनी विकृत अर्थ धरुन स्वार्थी कर्मकांडात हिंदू धर्माला बुडवून टाकले होते. त्यामुळे हिंदू धर्माचे सत्यं स्वरुप लोकांसमोर मांडुन पाश्चात्य विज्ञानाशी त्याची सांगड घालने अशी दुहेरी कामगिरी विवेकानंदापुढे होती ती विवेकानंदाने वेदान्त तत्वज्ञान मांडुन मोठ्या प्रमाणावर सिद्ध केली. वेदान्तामध्ये हिंदू धर्माचे सार सामावलेले आहे.

निष्कर्ष : :–

स्वामी विवेकानंदाच्या वेदान्त तत्वज्ञानाच्या विचारांचा अभ्यास केल्यानंतर काही निष्कर्ष पुढीलप्रमाणे सांगता येतात.

1. विवेकानंदानी आपणास वेदांकडे पाहण्याची एक नवी दृष्टी दिली.
2. निस्वार्थ मानव सेवा हाच खरा धर्म होय. हा मुलगामी विचार मांडला.
3. विवेकानंद पाश्चिमात्य जगातील भारतातील अध्यात्मीक क्षेत्रातील अग्रदुत होते.
4. स्वामी विवेकानंदाचा आधुनिक भारतातील अध्यात्मीक चळवळी व सामाजीक चळवळीला प्रेरणा देणारा विचार होता
5. विवेकानंदाने धर्माचे तत्वज्ञान केवळ मर्यादीत न ठेवता वेदान्त आणि व्यावहार असा व्यवहार्य धर्म आहे.
6. विवेकानंदाने वेदान्त हा सर्वधर्माचा आदर्श समन्वय निर्माण केला आहे.

संदर्भग्रंथ :

1. स्वामी विवेकानंद ग्रंथावली, रामकृष्ण मठ, नागपूर, पृ.क्र. 238–239
2. स्वामी विवेकानंद, संवाद आणि संभाषने, स्वामी विवेकानंद ग्रंथावली खंड क्र. 1, रामकृष्ण मठ, नागपूर, पृ.क्र 279
3. अभ्यंकर, वा. सु. युगाचार्य, स्वामी विवेकानंद, आदित्य प्रमिष्ठाण,पुणे. जाने 2003, पृ.क्र. 190.
4. स्वामी विवेकानंद, संवाद आणि संभाषने, स्वामी विवेकानंद ग्रंथावली खंड क्र. 3, रामकृष्ण मठ, नागपूर, पृ.क्र.89.
5. स्वामी विवेकानंद, स्वामी विवेकानंद ग्रंथावली खंड क्र. 5, रामकृष्ण मठ, नागपूर, पृ.क्र.236–237.
6. अभ्यंकर, वा. सु. युगाचार्य स्वामी विवेकानंद, आदित्य प्रमष्ठाण, पुणे. जाने 2003, पृ.क्र. 194.
7. स्वामी विवेकानंद, स्वामी विवेकानंद ग्रंथावली खंड क्र. 1, रामकृष्ण मठ, नागपूर, पृ.क्र.257
8. धनानंद, स्वामी आणि परिदंर(संपादक), स्वामी विवेकानंद टू ईस्ट अँड वेस्टर्न :रामकृष्ण वेदान्त सेंटर, लंडन पृ.क्र.9.
9. स्वामी विवेकानंद, स्वामी विवेकानंद ग्रंथावली खंड क्र. 1,रामकृष्ण मठ, नागपूर, पृ.क्र.288–239.